# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २४ जून, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**तीन : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(१) श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (क्रीडा)** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत आयटी, डिजिटल आणि स्टार्टअप राज्य म्हणून ओळखले जाणे, जगभरात ई-स्पोर्ट्स (Electronic Sports) हे अब्जावधी डॉलरचे उद्योगक्षेत्र बनले असून लाखो युवक त्यामध्ये व्यावसायिक कारकीर्द घडवत असणे, Counter-Strike, Valorant, Dota - 2 आणि League of Legends यांसारख्या खेळांच्या जागतिक स्पर्धांमध्ये कोट्यवधी रुपयांची बक्षिसे दिली जात असणे, सौदी अरेबिया, दक्षिण कोरिया, चीन आणि अमेरिका यांसारख्या देशांनी ई-स्पोर्ट्स क्षेत्रासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा, प्रशिक्षण केंद्रे आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केलेली असणे, भारतातील उत्तर प्रदेश, राजस्थान आणि केरळ या राज्यांनी देखील ई-स्पोर्ट्सला धोरणात्मक पाठबळ देण्यास सुरुवात केलेली असणे, मात्र महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात अद्याप ई-स्पोर्ट्ससाठी स्वतंत्र धोरण, प्रशिक्षण व्यवस्था, अधिकृत स्पर्धा आणि शैक्षणिक समावेश यांचा अभाव असणे, राज्यातील अनेक युवकांमध्ये या क्षेत्रात प्रचंड क्षमता असूनही योग्य मार्गदर्शन व संधीअभावी मागे पडत असणे, ई-स्पोर्ट्स क्षेत्रातून खेळाडूंसह प्रशिक्षक, विश्लेषक, व्हिडिओ एडिटर्स, ग्राफिक डिझायनर्स, इव्हेंट मॅनेजर्स, सोशल मीडिया व्यवस्थापक, मानसशास्त्रज्ञ आणि कायदेशीर सल्लागार अशा विविध रोजगार संधी उपलब्ध होण्याची शक्यता असणे, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने ई-स्पोर्ट्ससाठी स्वतंत्र धोरण जाहीर करून शालेय व महाविद्यालयीन स्तरावर त्याचा समावेश करणे, राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित

करणे, प्रशिक्षण केंद्रे उभारणे, युवकांना प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईचे फुफ्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बोरीवली येथील 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यान'चे नामांतर करून 'अटल बिहारी वाजपेयी पार्क' करण्याचा प्रस्ताव वन विभागाने तयार करून मुख्य वनसंरक्षकांकडे मंजुरीसाठी पाठविला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, पर्यावरण रक्षण व वनसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या तत्कालीन ५ कलमी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर, सन १९८१ मध्ये या उद्यानाला 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यान' असे नाव देण्यात आले असून, गेली ४५ वर्षे हे उद्यान याच नावाने जगभर ओळखले जात असणे, सदर उद्यानापासून अवघ्या १ किलोमीटर अंतरावर कांदिवली येथील पूर्व द्रुतगती मार्गावरील 'एसएआय' (SAI) च्या जागेत माजी पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी यांचे भव्य व उचित स्मारक आधीच उभारण्यात आलेले असणे, ऐतिहासिक ओळख असलेले संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे नाव बदलू नये, अशी मागणी निसर्गप्रेमी व नागरिकांकडून होत असणे, याबाबत शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे जनमानसात पसरलेला असंतोष व चिडीची भावना, परिणामी जनतेच्या भावना आणि वनसंवर्धन कायद्याचा ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेता, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या नामांतराचा प्रस्ताव पूर्णपणे रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. विवेक कोल्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र शासनामार्फत जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणारा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (POCRA) हा हवामान बदलामुळे प्रभावित शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता, उत्पन्न आणि हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी राबविण्यात येत असणे, प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील २१ जिल्ह्यांतील ७,१९६ गावांची निवड करण्यात येणे, मात्र विविध हवामान असुरक्षितता (Climate Vulnerability Index)

अहवालांमध्ये दुष्काळ, अनियमित पर्जन्यमान, भूजल पातळीतील घट, वाढते तापमान आणि शेती उत्पादनातील अनिश्चितता यामुळे अहिल्यानगर जिल्हा हा राज्यातील संवेदनशील जिल्ह्यांपैकी एक मानला जाणे, जिल्ह्यातील अनेक तालुके सातत्याने दुष्काळ व पाणीटंचाईच्या समस्यांना सामोरे जात असूनही POCRA Phase-II मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला नसणे, त्यामुळे हवामान बदलाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी या महत्त्वाच्या प्रकल्पाच्या लाभापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली परिस्थिती, जिल्ह्यातील पात्र गावे व तालुक्यांचा प्रकल्पामध्ये समावेश करण्याची होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सार्वजनिक आरोग्य विभागाकडून विविध बालसंगोपन योजना राबवल्या जात असल्याचा दावा केला जात असतानाही, राज्यात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात तब्बल १२,७९२ बालकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक शासकीय आकडेवारी माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली असणे, राज्यात आजही दररोज सरासरी ३५ बालकांना आपले प्राण गमवावे लागत असून पाच वर्षांपूर्वीच्या सरासरी ४५ मृत्यूंच्या तुलनेत घट झाली असली तरी बालमृत्यू रोखण्याचे मोठे आव्हान आरोग्य यंत्रणेच्या निष्क्रियतेमुळे आजही कायम असणे, नवजात बालकांचा अकाली जन्म, जन्मतः असणारे कमी वजन, जन्मावेळी श्वास न लागणे (बर्थ ॲस्फिक्सिया), श्वसनावरील ताण, न्यूमोनिया, सेप्सिस आणि जन्मजात विकृती यांसारख्या गंभीर व उपचार होणे शक्य नसल्याच्या कारणांमुळे शून्य ते पाच वर्ष वयोगटातील हजारो निष्पाप बालके दगावत असणे, दुर्गम व ग्रामीण भागात लसीकरण पथके कार्यरत असल्याचा दावा केला जात असला तरी अनेक बालके अद्यापही मूलभूत आरोग्य सेवा व लसीकरणापासून वंचित राहत असल्याने राज्यातील बालमृत्यूचे हे विदारक प्रमाण पूर्णपणे शून्यावर आणण्यासाठी तातडीने विशेष तज्ञ समित्यांच्या अहवालानुसार युद्धपातळीवर ठोस उपाययोजना करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**पाच : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियम) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

---

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विधेयक विचारात घेणे :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६

---

**(घ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**सहा : सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, पंकज भुजबळ, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री संजय खोडके, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, डॉ. परिणय फुके, श्री. किशोर दराडे, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, विक्रांत पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री वसंत खंडेलवाल, अमित गोरखे, ज्ञानेश्वर म्हात्रे, अमरिशभाई पटेल, प्रमोद जठार, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, श्रीमती माधवी नाईक, सर्वश्री संजय भेंडे, राजहंस सिंह, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (मंत्र्यांचे उत्तर)**

"सन १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आतापर्यंत अतिवृष्टी, अनावृष्टी, विषाणूजन्य रोग इत्यादीमुळे शेतकरीबांधव व शेतीव्यवसाय अनेकवेळा अडचणीत येणे, परंतु, सन २०१४ पर्यंत तत्कालीन शासनाने राज्यशासनाच्या तिजोरीतून एकदाही कर्जमाफी न देणे, सन २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर पहिल्यांदा राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मानयोजना राबवून लाखो शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा प्रयत्न करणे, सन २०२०-२०२१ मध्ये तत्कालीन राज्य शासनाने महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजना जाहीर करणे परंतु कर्जाची मर्यादा रुपये २ लाख असल्याने अधिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ न मिळणे, विद्यमान शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर करणे मात्र, या योजनेमध्ये दोन लाखांवर कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश असणे, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रुपये ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना समाविष्ट असणे, या सोबतच आत्महत्याग्रस्त जिल्हयातील कापसाच्या उत्पादन वाढीसाठी 'कापूस उत्पादकता मिशन'ची केंद्रे स्थापन करण्याचे प्रयोजन असणे, एलनिनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०२६ मध्येच घेऊन अधिकाऱ्यांना सूचना देणे, त्याअनुषंगाने जलयुक्त शिवार टप्पा २ च्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यामध्ये जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात करण्यात येणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी सर्वांचा सहभाग घेऊन लोकचळवळ उभी करण्याची आवश्यकता, राज्यात 'नमो शेतकरी महासन्मान योजना', 'कृषी समृध्दी योजना', 'महाडिबीटी एकत्रित प्रणाली', 'महिला शेतकरी व गोपालकांसाठी योजना' राबविण्यात येणे, शेतीत फवारणी, पिक निरिक्षण, किड नियंत्रण, जमिनीचे विश्लेषण इ. साठी ड्रोन व रोबोटिक्सचा वापर करण्यात येणे, शेती क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी मोठी भांडवली गुंतवणूक करण्याचे शासनाचे प्रयोजन असणे, गोपीनाथ मुंडे अपघात अनुदान योजनेचा विस्तार करुन त्यात शेतमजुरांनाही विमा संरक्षण देण्यात येणे, 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजना' राबविण्यात येणे, संपूर्ण राज्यात 'महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान'

राबविण्यात येणे, अशाप्रकारे राज्यातील शेतकरी स्वयंपूर्ण व कर्जमुक्त होण्याच्या दृष्टीने आणि नैसर्गिक बदलाचा सामना करण्यास सक्षम होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने घेतलेले निर्णय व त्याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**सात : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**"**नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव हे अतिदुर्गम व आदिवासीबहुल तालुके असून या भागातील आशा सेविका प्रतिकूल परिस्थितीत आरोग्य सेवा बजवित असणे, अनेक दुर्गम पाड्यांपर्यंत रस्ते व रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध नसल्याने प्रसूती माता व बालकांना आरोग्य केंद्रात नेण्यासाठी खाजगी वाहनांचा वापर करावा लागत असून संबंधित खर्चाचा परतावा अपुरा व विलंबाने मिळत असल्याची बाब निदर्शनास येणे, केंद्र शासनाकडील प्रोत्साहनपर मानधन, मोबाईल खर्च, आपत्कालीन सेवा मोबदला, पुरुष नसबंदी प्रोत्साहनपर मानधन व जननी सुरक्षा योजनेतील लाभ अपुरे असल्याने आशा सेविकांमध्ये असंतोष निर्माण होणे, तसेच प्रसूती सेवेदरम्यान आशा सेविकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असून निवास व मूलभूत सुविधांचाही अभाव असणे, परिणामी दुर्गम भागातील मातृ-बाल आरोग्य सेवांच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, याकरिता नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील आशा सेविकांना योग्य मानधन, वाहतूक सुविधा, आपत्कालीन सहाय्य, पुरुष नसबंदी प्रोत्साहनपर मानधनात वाढ व दुर्गम भत्ता उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.**"**

**(२) सर्वश्री संजय खोडके, इद्रिस नायकवडी, सतिश चव्हाण, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"पुणे जिल्हा परिषदेमार्फत शिक्षण व कौशल्य विकास क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून, 'इंडस्ट्री ४.०' संकल्पनेअंतर्गत जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असणे, तसेच महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मगावी खानवडी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची राज्यातील पहिली सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित जिल्हा परिषद शाळा सुरू करण्यात आली असणे, या शाळांमधून

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध होत असून फ्रेंच, जर्मन यांसारख्या परकीय भाषांचे प्रशिक्षण दिले जात असणे, त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला असणे, तसेच महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले असून राज्यात एक हजार अत्याधुनिक कौशल्य विकास केंद्रांची उभारणी करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्र्यांनी केलेली असणे, याशिवाय नायगाव व कटगुण येथे महात्मा जोतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वारसा जपण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे स्मारक व विविध विकास प्रकल्प उभारण्याचे नियोजन शासनाने केले असणे, वरील सर्व उपक्रम शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती व सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व राज्यासाठी आदर्शवत ठरणारे असणे, त्यामुळे पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या या शैक्षणिक व कौशल्य विकासाच्या यशस्वी उदाहरणाची राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे, तसेच यासाठी निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट, कृती आराखडा, निधीची तरतूद, कालबद्ध कार्यक्रम व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २३ जून, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.